स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक गट-क या संवर्गातील कर्मचा-यांना कनिष्ठ अभियंता गट क या पदावर पदोन्नती देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.बांध/आस्था-२/४६८ /२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केले प्रमाणे.

वाचा :- १.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट ६ नियम ५
२.ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.०२ फेब्रा‌ुवारी,२००६
३.मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२अे/१६-ब दि.२९/१२/२०१७
४.पदोन्नती निवड समितीचे मंजुर इतिवृत्त दिनांक ६/४/२०२६

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (दुय्यम अभियांत्रिकी) द्वितीय श्रेणी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना **कनिष्ठ अभियंता गट-क या पदावर वेतनबॅन्ड** एस-१५ -४१८००-१३२३०० अधिक प्रचलित दराने मिळणारे भत्ते मध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीच्या अधिन राहून रकाना क्र.५ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे. पदोन्नती दिलेली पदस्थापना ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या निर्णयांच्या अधिन राहुन खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याने तुर्तास पदोन्नतीच्या कोठयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन तदर्थ पदोन्नतीने भरणेत येत आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | सध्याचे कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापना दिलेले कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. सय्यद जब्बार जाफरभाई पटेल | जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव | सेवाजेष्ठतेनूसार | जि.प.सा.बा.उपविभाग -पाथर्डी |
| २ | श्री.अशोक त्रिंबक बोराडे | जि.प.सा.बा.उपविभाग पाथर्डी | सेवाजेष्ठतेनूसार | जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव |
| ३ | श्री.राहुल जगन्नाथ सोनवणे | जि.प.सा.बा.उपविभाग पारनेर | सेवाजेष्ठतेनूसार | जि.प.सा.बा.उपविभाग -संगमनेर |
| ४ | श्री संकेत बाळासाहेब शेंडगे | जि.प.सा.बा.उपविभाग पारनेर | सेवाजेष्ठतेनूसार | ग्रामिण पाणी पुरवठा विभाग जि.प. अहिल्यानगर |

अटी व शर्ती -

१. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका . २८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयांच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरती स्वरुपात देणेत येत आहे.

२.सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.

३.शासन निर्णय दि.०१/०४/२०१०, दि.०२/०३/२०१९ मधील तरतुदींनुसार सुधारीत सेवांतर्गत अश्वसित प्रगती योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ (पदोन्नतीच्या पदाचा) मंजूर केलेल्या कर्मचा-यांनी सदर पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.

४.नेमणूकीच्या ठिकाणी विहित कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणूकीचे पदस्थापनेत बदल करणेसाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.

५.संबधीत कार्यालय प्रमुखांनी कर्मचा-यास पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने ०७ दिवसाचे आत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा सेवा ज्येष्ठता डावलली जाईल. तसेच सदरची पदोन्नती स्विकारत/नाकारत असलेबाबतचे लेखी पत्र संबधिताने त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत सात दिवसांत जि.प.सा.बा.उत्तर विभाग अहिल्यानगर येथे सादर करावे.

६.श्री संकेत बाळासाहेब शेंडगे यांनी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचा विकल्प दिलेला असल्याने शासन निर्णय दिनांक २१/१०/२०११ मधील तरतुदीनुसार त्यांच्या नावाचा समावेश संबंधित संवर्गाच्या सेवा ज्येष्ठता यादीमध्ये करण्यात यावा.

७.श्री संकेत बाळासाहेब शेंडगे यांची कनिष्ठ अभियंता या पदावर ग्रा.पा.पु.विभागाच्या अधनस्त पदोन्नती झाली असल्याने त्यांना ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी त्यांचे पदोन्नतीच्या कोटयातील मंजूर पदानुसार विहित बिंदू क्रमांकावर दर्शवावे.

८.श्री.राहुल जगन्नाथ सोनवणे-स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक यांचेकडे प्रलंबित असलेली वसुली बाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिटपिटिशन ५०१८/२०२६ दाखल केलेले असून सदर वसुलीस स्थगीती देण्यात आलेली आहे. मा. न्यायनिर्णयानंतर न्यायर्निणयाच्या अधिन राहून वसुलीबाबतची जबाबदारी संबधीत कार्यालय प्रमुख यांची राहील.

९.सदरचे आदेशाची नोंद संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून त्याचा संकेतांक क्र. 202609301300037 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 30-09-2026 16:47:30

आनंद भंडारी (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१.श्री. सय्यद जब्बार जाफरभाई पटेल-स्थापत्य अभियांत्रिकी सहा.जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव
२.श्री.अशोक त्रिंबक बोराडे-स्थापत्य अभियांत्रिकी सहा. जि.प.सा.बा.उपविभाग पाथर्डी,जिल्हा अहिल्यानगर
३.श्री संकेत बाळासाहेब शेंडगे- स्था. अभि. सहा. जि.प.सा.बा.उपविभाग पारनेर, जिल्हा अहिल्यानगर
४.श्री.राहुल जगन्नाथ सोनवणे, स्था. अभि .सहा. जि.प.सा.बा.उपविभाग पारनेर, जिल्हा अहिल्यानगर

प्रत उप अभियंता जि.प.सा.बा. /ग्रा.पा.पु.उपविभाग शेवगाव/पाथर्डी/पारनेर यांना पुढील योग्य त्याकार्यवाहीसाठी
२/-वरील संबधीत कर्मचारी यांना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होणेकामी उचित कार्यवाही करुन तातकाळ कार्यमुक्त करावे.

प्रत उप अभियंता जि.प.सा.बा. उपविभाग-------------------- जिल्हा अहिल्यानगर
२/- वरील संबधीत कर्मचारी हे हजर झालेनंतर हजर अहवाल तात्काळ याकार्यालयास सादर करावा.

प्रत :- माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सादर
१.मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी
२.मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.अहिल्यानगर , यांना माहितीसाठी
३.मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी
४.मा.कार्यकारी अभियंता ग्रामिण पाणी पुरवठा विभाग-जि.प.अ.नगर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
५.मा.कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (उत्तर / दक्षिण) जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
५.संबधीत गट विकास अधिकारी, पंचायत समिती --------
६.निवड नस्ती